# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 09 वाजून 20 मिनिटं

**दिनांक:23.04.2024** **वार:मंगळवार**

1. लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराला वेग
2. तिसऱ्या टप्प्यासाठी महाराष्ट्रातल्या 11 मतदारसंघात 258 उमेदवार निवडणूक रिंगणात
3. देशाच्या विविध भागात हनुमान जयंती उत्साहात साजरी आणि
4. पुर्वेकडील भागात उद्यापासून उष्णतेच्या लाटेचा हवामान विभागाचा अंदाज

**दुसरा टप्पा**

लोकसभा निवडणूकीच्या दुसऱ्या टप्प्यासाठीच्या प्रचाराचा उद्या अंतिम दिवस आहे. या पार्श्वभूमीवर सर्वच राजकीय पक्षांचे प्रमुख नेते आपापल्या उमेदवारांसाठी प्रचारसभा, रोड शो आणि मतदारांची प्रत्यक्ष भेट घेऊन पक्षाची भूमिका मांडत आहेत. पंतप्रधान आणि भाजपाचे ज्येष्ठ नेते नरेंद्र मोदी यांनी काल उत्तरप्रदेशमधल्या अलिगढ इथं प्रचारसभेला संबोधित केलं. विरोधी पक्ष घराणेशाही करत असून, देशातली गरिबी हटवण्याची, भ्रष्टाचार आणि घराणेशाही नष्ट करण्याची हीच वेळ आहे, असं ते म्हणाले. काल बुलंदशहर जिल्ह्यातील एका राजकीय सभेत बसपा प्रमुख मायावती यांनी भाजपावर हल्लाबोल केला. भाजप हा केवळ गप्पा करणारा पक्ष आहे,सामान्य नागरिकांना मोठी स्वप्न दाखवली जातात मात्र प्रत्यक्ष कोणतंही काम होत नाही, असा आरोप त्यांनी केला. काँग्रेसचे उत्तर प्रदेशचे प्रभारी अविनाश पांडे यांच्यासह पक्षाच्या इतर कार्यकर्त्यांनीही पक्ष कार्यकर्त्यांच्या बैठका घेतल्या. मथुरा आणि फतेहपूर सिक्री भागात घरोघरी प्रचार केला. पंतप्रधान आजपासून दोन दिवस छत्तीसगढच्या दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान ते विविध लोकसभा मतदारसंघातील उमेदवारांसाठी जाहीर सभा घेतील. तसंच ते राजस्थानमध्येही जाहीर सभा घेणार आहेत.

**अमित शहा**

केंद्रिय गृहमंत्री अमित शहा आज महाराष्ट्रातल्या अकोला इथं भाजपा उमेदवार अनूप धोत्रे यांच्या प्रचारसभेला संबोधित करणार आहेत. अनूप हे सध्या आजारी असलेले विद्यमान खासदार संजय धोत्रे यांचे चिरंजीव आहेत. या भागात कॉंग्रेसकडून डॉ अभय पाटील यांना उमेदवारी देण्यात आली असून वंचित बहुजन आघाडीचे प्रमुख आणि माजी खासदार अडव्होकेट प्रकाश आंबेडकर यांच्यासह 17 उमेदवार या मतदारसंघातून निवडणूकीच्या रिंगणात आहेत. मतदान येत्या 26 एप्रिल रोजी होणार आहे. अमरावतीच्या भाजपा उमेदवार नवनीत राणा यांच्यासाठी अमित शहा उद्या अमरावतीत प्रचार सभा घेणार आहेत.

**अर्जमुदत**

लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातली उमेदवारी मागे घेण्याची मुदत काल संपली. तिसऱ्या टप्प्यात महाराष्ट्रातल्या रायगड, बारामती, उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, माढा, सांगली, सातारा, रत्नागिरी-सिंधुदुर्ग, कोल्हापूर आणि हातकणंगले या 11 मतदारसंघामध्ये 7 मे रोजी मतदान होणार आहे. यासाठी 317 उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले होते. त्यातील काही उमेदवारांनी माघार घेतल्याने आता 258 उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

**चौथाटप्पा अर्ज**

लोकसभा निवडणुकीच्या चौथ्या टप्प्यातले उमेदवार अर्ज भरायला सुरुवात झाली आहे. महाराष्ट्रात औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातील महाविकास आघाडीचे उमेदवार चंद्रकांत खैरे यांनी काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी ज्येष्ठ नेते शरद पवार, अंबादास दानवे उपस्थित होते. याच मतदारसंघात महायुतीचे उमेदवार म्हणून शिवसेनेचे संदिपान भुमरे यांनीही काल अर्ज दाखल केला. बीडमधे राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे उमेदवार बजरंग सोनावणे यांनी काल अर्ज भरला. नंदुरबार लोकसभा मतदारसंघात भाजप उमेदवार डॉ. हिना गावित तसंच काँग्रेसचे उमेदवार गोवाल पाडवी यांनी उमेदवारी अर्ज दाखल केला. मावळ लोकसभा मतदारसंघातील महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत काल उमेदवारी अर्ज दाखल केला. अहमदनगर लोकसभा मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार सुजय विखे पाटील यांनी देखील काल आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. शिर्डी मतदारसंघात शिवसेनेचे

उमेदवार सदाशिव लोखंडे यांनीही अर्ज दाखल केला. त्यानंतर राहता इथं झालेल्या प्रचारसभेला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी संबोधित केलं.

**<u>काँग्रेस यादी</u>**

लोकसभा निवडणूकीसाठी बिहारमधल्या 5 आणि पंजाबच्या 2 अशा सात उमेदवारांचा समावेश असलेली यादी काँग्रेसनं काल जाहीर केली. पक्षाने सासाराममधून मनोज कुमार आणि बिहारमधील मुझफ्फरपूर लोकसभा मतदारसंघातून अजय निषाद यांना उमेदवारी दिली आहे. पंजाबसाठी होशियारपूरमधून यामिनी गोमर यांना तर अमरजीत कौर साहोके फरीदकोटमधून निवडणूक लढवणार आहेत. काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीने ही नावे निश्चित केली.

**<u>मणिपूर</u>**

मणिपूरमधील 11 मतदारसंघात काल पुनर्मतदान शांततेत पार पडलं. या भागात 81 पूर्णांक 61 टक्के मतदानाची नोंद झाली. पहिल्या टप्प्यात 19 एप्रिल रोजी झालेल्या मतदानात काही हिंसक घटना घडल्या तसंच आणि बोगस मतदान झाल्याचा आरोप होता. मणिपूरच्या मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांनी याबाबतचा अहवाल निवडणूक आयोगाला सादर केल्यानंतर आणि काल पुन्हा मतदान घेण्यात आलं. दरम्यान, मणिपूरमध्ये लोकसभा निवडणुकीच्या दुस-या टप्प्यातील निवडणूक प्रचाराला वेग आला आहे. 26 एप्रिल रोजी बाह्य मणिपूर संसदीय मतदारसंघातील तेरा विधानसभा क्षेत्रांमध्ये मतदान होणार आहे.

**<u>गुजरात</u>**

गुजरातमध्ये 266 उमेदवार लोकसभेसाठी तर 24 उमेदवार विधानसभेच्या पोटनिवडणूकीसाठी निवडणूकीच्या रिंगणात आहेत. उमेदवारी अर्ज मागे घेण्याच्या शेवटच्या दिवशी काल गुजरातमधील निवडणुकीचं चित्र स्पष्ट झालं. निवडणुकीपूर्वी भारतीय जनता पक्षानं सुरत लोकसभेची जागा बिनविरोध जिंकली आहे. सुरतच्या जागेसाठी काँग्रेसच्या उमेदवारांचा अर्ज बाद झाल्यानंतर इतर विरोधी उमेदवारांनी आपापले अर्ज मागे घेतल्यानं, भाजपाचे मुकेश दलाल यांना विजयी घोषित करण्यात आलं. संपूर्ण गुजरात आणि केंद्रशासित प्रदेश असलेल्या दमण दीव आणि दादरा नगर हवेलीमध्ये 7 मे रोजी एकाच टप्प्यात मतदान होणार आहे.

**<u>राष्ट्रपती उत्तराखंड दौरा</u>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू आजपासून दोन दिवस उत्तराखंडच्या दौऱ्यावर आहेत. हृषीकेश इथल्या अखिल भारतीय आयुर्विज्ञान संस्था अर्थात एम्सच्या पदवीप्रदान कार्यक्रमाला त्या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहतील. या दौऱ्यादरम्यान ऋषिकेश इथल्या परमार्थ आश्रमाच्या प्रतिनिधींशी त्या चर्चा करतील तसंच संध्याकाळच्या गंगा आरतीला उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रपती उद्या डेहराडून इथं होणाऱ्या भारतीय वन सेवेच्या प्रशिक्षणार्थींच्या पदवीप्रदान समारंभाला प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार आहेत.

**<u>हनुमान जयंती</u>**

चैत्र पौर्णिमा म्हणजेच हनुमान जयंतीनिमित्त आज ठीकठिकाणच्या हनुमान मंदिरात भाविकांनी मोठी गर्दी केली आहे. देशभरात विविध ठिकाणी सूर्योदयाच्या मुहूर्तावर हनुमान जन्मोत्सव साजरा करण्यात आला. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासियांना हनुमान जयंतीच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<u>नौदल मोहीम</u>**

भारतीय महिला अधिकाऱ्यांचा सहभाग असलेलं INS तारिणी हे जहाज सागरी मोहीम यशस्वीरित्या पूर्ण करुन गेल्या रविवारी मायदेशी परतलं. गोवा ते मॉरिशसमधल्या पोर्ट लुईसपर्यंतची ही ऐतिहासिक सागरी मोहीम होती. दोन महिने चाललेल्या या ऐतिहासिक मोहीमेत भारतीय नौदलातल्या महिला अधिकारी लेफ्टनंट कमांडर दिलना के, आणि लेफ्टनंट कमांडर रूपा ए शोध मोहीमेत सहभागी झाल्या होत्या. गोव्यातून 28 फेब्रुवारीला तारिणी या जहाजाने प्रयाण केलं. हे जहाज 21 मार्च रोजी मॉरिशसच्या पोर्ट लुईस या बंदरावर पोहोचलं. दोनही देशांदरम्यानचे सागरी क्षेत्रातील परस्पर संबंध दृढ करण्याच्या संदर्भातील प्रशिक्षणही या मोहिमेदरम्यान त्यांना देण्यात आलं.

**<u>तैवान भूकंप</u>**

तैवानमध्ये काल रात्री भूकंपाचे तीव्र धक्के बसले. या भूकंपाची रिख्टर मापकावर 6 पुर्णांक 1 तीव्रतेची नोंद झाली, अशी माहिती भूगर्भ शास्त्र विभागानं दिली. हुयालीन शहराच्या 28 किलोमीटर दक्षिणेला साधारण साडेदहा किलोमीटर जमीनीखाली या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. या भागाला 4 पुर्णांक 5 ते 6 रिख्टर क्षमतेचे आणखी 6 धक्के गेल्या रात्रभरांत जाणवले. इतर तपशीलाची प्रतीक्षा आहे. या महिन्याच्या सुरुवातीला 7 पुर्णांक 4 रिश्खर तीव्रतेचा भूकंप झाला होता, तैवानमध्ये गेल्या 25 वर्षांतील हा सर्वात शक्तिशाली भूकंप होता.

**एशियन ज्युडो चॅम्पियनशिप**

भारताच्या तुलिका मान नं आशियाई ज्युदो अजिंक्यपद स्पर्धेच्या उपान्त्य फेरीत प्रवेश केला आहे. या स्पर्धा हाँगकाँग इथं सुरू आहेत. तुलिका मान नं महिलांच्या 78 किलो वजनी गटात, जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या, किम हायुनचा पराभव करत ही उपांत्य फेरीत स्थान मिळवलं.

**निवडणूक आयोग**

देशभरात वाढलेल्या उष्णतेच्या पार्श्वभूमीवर, लोकसभा निवडणूकीच्या प्रत्येक टप्प्यापुर्वी आढावा घेण्याच्या उद्देशानं, केंद्रिय निवडणूक आयोगानं कृती दलाची स्थापना केली आहे. प्रत्येक मतदान टप्प्याच्या पाच दिवस आधी उष्णतेची लाट आणि आर्द्रतेमुळे नागरिकांवर होणाऱ्या परिणामांचा आढावा ते घेतील आणि उन्हाचा त्रास कमी करण्यासाठी उपाययोजना सुचवतील. दरम्यान येत्या 26 तारखेला होणाऱ्या मतदान प्रक्रियेच्या वेळी उष्णतेसंदर्भात कोणताही इशारा नसून 13 राज्य आणि केंद्रशासित प्रदेशातील हवामान सामान्य राहील अशी माहिती हवामानशास्त्र विभागानं निवडणूक आयोगाला दिली.

**हवामान**

पुढील चार दिवस देशाच्या पुर्वेकडील राज्यात उष्णतेची काहिली वाढण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे. दुसरीकडे, हवामान खात्यानं ईशान्य भारतात उद्यापर्यंत मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवला आहे. अरुणाचल प्रदेश, आसाम, मेघालय, नागालँड, मणिपूर, मिझोराम आणि त्रिपुरामध्ये हलक्या ते मध्यम पावसाची शक्यता आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार